## * वक्तृत्व स्पर्धा प्रवेश अर्ज *

मा. कार्याध्यक्ष,
अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे.

महोदय,

आपल्या महाविद्यालयातर्फे होणाऱ्या माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेसाठी आमच्या माध्यमिक विद्यालयाचा / कनिष्ठ विद्यालयाचा / वरिष्ठ महाविद्यालयाचा प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ किंवा वैयक्तिक स्पर्धक पाठवित आहोत. स्पर्धेचे शुल्क २००/- रोखीने किवा QR स्कॅन करुन पाठविले आहे. स्पर्धेचे सर्व नियम आम्हाला मान्य आहेत. तरी स्पर्धेसाठी प्रवेश मिळावा ही नम्र विनंती.

माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे नाव :

गाव : तालुका : जिल्हा :
दिनांक :

आपला विश्वासू,

माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

प्राचार्य / मुख्याध्यापक

### * माध्यमिक/कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धक *

| अ.नं. | स्पर्धकाचे नाव | वय | वर्ग | निवडलेला विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

### * अधिक माहितीसाठी संपर्क *

प्रा. सुनिल सालके मो. नं. ८०५५४७९१२२
प्रा. एस. डी. पवळे मो. नं. ९४२०६३४५०७
प्रा. डॉ. विलास सदाफळ मो. नं. ९४२१०५३७५१
प्रा. कैलास एरंडे मो. नं. ९५२७८९८८५०

बुक-पोस्ट

प्रति,
मा. प्राचार्य/मुख्याध्यापक
श्री.

प्रेषक -
प्राचार्य,
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे.

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद !" - कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे

# अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज व सौ. कुसुमबेन कांतीलाल शाह आर्टस्, कॉमर्स, सायन्स ज्युनियर कॉलेज,

मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे. पिन - ४१०५०३.
नॅक 'A' ग्रेड मानांकन (Fourth Cycle)



वर्ष ५३ वे
२०२३-२४

# अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

स्पर्धेची तारीख : शनिवार दि.३०/१२/२०२३

मा. प्राचार्य/मुख्याध्यापक,
सविनय नमस्कार वि. वि.
महोदय,

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षण संस्था महाराष्ट्राच्या लोकजीवनात दुर्दम्य ध्येयनिष्ठेने आणि सामाजिक परिवर्तनाच्या तळमळीने शहराबरोबरच ग्रामीण भागाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या विविध जातीधर्माच्या गोरगरीब मुला-मुलींना ज्ञान देण्याचे गेल्या शतकाहून अधिक काळ काम करीत आहे.

कर्मवीर भाऊरावांच्या अथक परिश्रमातून निर्माण झालेले हे लोकोत्तर शैक्षणिक शिल्प महाराष्ट्राचे शांतीनिकेतन आहे. तिच्याच ज्योतिर्मयी दीपमाळेतील दीपशाखा म्हणजे मंचरचे अण्णासाहेब आवटे महाविद्यालय ! शिवतिर्थाच्या पवित्र भूमीत आज मोठ्या अभिमानाने मार्गस्थ आहे. १०५ एकरातील आपल्या नाविन्यपूर्ण वनश्री प्रकल्पाने नटलेल्या या महाविद्यालयाची कीर्तीपताका सातासमुद्रापार फडकत आहे.

अठावन्न वर्षांचा दैदिप्यमान इतिहास व उज्वल परंपरा असलेले हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेच्या कार्यक्षेत्रातील एक नामवंत महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील आंबेगाव तालुक्याचे प्रथम आमदार देशभक्त अण्णासाहेब आवटे व तालुक्यातील थोर हुतात्मा बाबू गेनू सैद यांच्या नावाने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालयात अनेक उपक्रम राबविले जातात. महाराष्ट्राला वक्तृत्वाची थोर परंपरा आहे. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाचा विकास होऊन त्यांच्या कर्तृत्वाच्या वाटा उजळाव्यात म्हणून गेली ५२ वर्ष आम्ही कै. अण्णासाहेब आवटे स्मृतीप्रित्यर्थ ही वक्तृत्व स्पर्धा आयोजित करत आहोत. कै. अण्णासाहेब आवटे यांनी जनमाणसात आपली निरलस, विनयशील, समदर्शी व सौहार्दपूर्ण अंतःकरणयुक्त मनभावन अशी अवीट प्रतिमा निर्माण केली होती. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आपल्या माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन युवाशक्तिला विचार प्रवृत्त करण्यासाठी यथोचित अभिव्यक्तिसाठी आम्ही एक विचारमंच उपलब्ध करुन देत आहोत. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची नितांत गरज आहे. कृपया आपल्या माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ किंवा वैयक्तिक स्पर्धक पाठवून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

अधिक माहितीसाठी वेबसाईट : www.aacmanchar.edu.in

## ❋ आपले विश्वासू ❋

प्रा. सुनिल सालके, कार्याध्यक्ष
डॉ. एन. एस. गायकवाड, प्राचार्य

प्रा. एस. डी. पवळे, उपप्राचार्य, कनिष्ठ विभाग

अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे.

## ❋ वक्तृत्व स्पर्धेचे नियम ❋

- ❋ वक्तृत्व स्पर्धा मराठी भाषेत होईल.
- ❋ रयत शिक्षण संस्था व राज्यातील आठवी ते महाविद्यालयीन विद्यार्थी / विद्यार्थिनींसाठी ही स्पर्धा खुली आहे. प्रत्येक माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयास दोन स्पर्धकांचा प्रत्येकी एक संघ किंवा वैयक्तिक स्पर्धक पाठविता येईल.
- ❋ प्रवेश शुल्क २००/- रु. अर्जाबरोबर समक्ष वेळेत जमा करावेत. (प्रत्येक संघासाठी) किंवा QR कोड स्कॅन करुन भरु शकता.
- ❋ वैयक्तिक स्पर्धकास स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रत्येकी २००/- रु. प्रवेश शुल्क आकरले जाईल.
- ❋ माध्यमिक स्पर्धकासाठी ५ मिनिटे, कनिष्ठ विद्यालयीन स्पर्धकासाठी ६ मिनिटे व वरिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धकासाठी ७ मिनिटे बोलण्यासाठी वेळ दिला जाईल.
- ❋ प्रवेश अर्ज अधिकृत नमुन्यात असला पाहिजे.
- ❋ अण्णासाहेब आवटे स्मृती चषकासाठी सर्वाधिक गुण मिळवणारा स्पर्धक संघ विचारात घेतला जाईल. स्पर्धकांची फक्त राहण्याची सोय महाविद्यालयातर्फे करण्यात येईल.
- ❋ प्रवेश अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख ३०/१२/२०२३ सकाळी ८.३० वाजेपर्यंत राहील.
- ❋ स्पर्धेचा निकाल स्पर्धा संपल्यावर जाहीर केला जाईल व तो सर्वांवर बंधनकारक असेल.
- ❋ स्पर्धकाकडे चालू शैक्षणिक वर्षातील शाळा/महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे गरजेचे आहे.
- ❋ स्पर्धेच्या नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार अण्णासाहेब आवटे महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा समितीकडे राहतील.

### प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क पाठविण्याचा पत्ता

कार्याध्यक्ष प्रा. सुनिल सालके (संपर्क क्र. ८०५५४७९१२२)
अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर,ता.आंबेगाव जि.पुणे. ४१०५०३.
नावनोंदणी साठी गुगल फॉर्म लिंक : https://forms.gle/Jkpkv95J23avVpFB9

प्रवेश फी भरण्यासाठी QR कोड

### ❋ संयोजन समिती सदस्य ❋

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. व्ही. डी. सदाफळ | प्रा. पी. एस. कणसे |
| प्रा. के. बी. एरंडे | प्रा. एस. डी. पवळे |
| प्रा. आर. सी. भोर | प्रा. एस. टी. पोकळे |
| प्रा. डॉ. एस. सी. महाकाळ | प्रा. डॉ. एस. एस. पाटील |
| प्रा. डॉ. एस. एस. रुपनर | प्रा. भोर पी. डी. |

## ❋ वक्तृत्व स्पर्धा ❋

स्पर्धेची तारीख : शनिवार दि. ३०/१२/२०२३
स्थळ : डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील सभागृह, अ.आवटे कॉलेज, मंचर
उद्घाटन : सकाळी ९.३० वाजता
पारितोषिक वितरण : स्पर्धा संपल्यानंतर

### ❋ वैयक्तिक पारितोषिके ❋

| अ गट<br>माध्यमिक | ब गट<br>कनिष्ठ विद्यालयीन | क गट<br>वरिष्ठ महाविद्यालयीन |
|---|---|---|
| प्रथम क्र. ३००० रु.<br>द्वितीय क्र. २००० रु.<br>तृतीय क्र. १००० रु.<br>उत्तेजनार्थ ७०० रु. | प्रथम क्र. ५००० रु.<br>द्वितीय क्र. ३००० रु.<br>तृतीय क्र. २००० रु.<br>उत्तेजनार्थ १००० रु. | प्रथम क्र. ७००० रु.<br>द्वितीय क्र. ५००० रु.<br>तृतीय क्र. ३००० रु.<br>उत्तेजनार्थ १००० रु. |

### ❋ प्रत्येक विजयी स्पर्धकास ट्रॉफी ❋

❋ सौजन्य ❋

मा. श्री. अशोकशेठ रामदास बाजारे
सदस्य, पुणे जिल्हा रस्ता सुरक्षा समिती
मा. श्री. वसंत विठ्ठल एरंडे
सदस्य, आंबेगाव तालुका शिक्षण समिती

**प्रत्येक विजयी संघास कै. अण्णासाहेब आवटे स्मृती चषक**

### ❋ स्पर्धेचे विषय ❋

**अ गट माध्यमिक**

१. कर्मवीर भाऊराव पाटील - एक विचारधारा
२. कल्याणकारी राजा - छत्रपती शिवराय
३. मला पडलेले सुंदर स्वप्न
४. वाचाल तर वाचाल

**ब गट कनिष्ठ विद्यालयीन**

१. व्यसन सोशल मिडियाचे, पालटले चित्र समाजाचे
२. चांद्रयान आणि भारत
३. शेतकऱ्याची व्यथा
५. पर्यावरण संवर्धन

**क गट वरिष्ठ महाविद्यालयीन**

१. आरक्षण : वास्तव आणि गरज
२. कृत्रिम बुध्दिमत्ता आणि मानव
३. डिजिटल इंडिया
४. प्रसार माध्यमे की प्रचार माध्यमे